**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांकः २/एनजीसी/संकेतस्थळ/२०१०/३५०
दिनांक : - 8 फरवरी FEB 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्थाबाबतची माहिती अद्यावत करणेबाबत....**

"अ" वरील विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या शासकीय /अशासकीय अनुदानित व खाजगी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांबाबतची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन ती या संचालनालयास तात्काळ सादर करण्याबाबत संबंधित संस्थांना आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावे. तसेच संबंधित संस्थेने संचालनालयाची वेबसाईट लॉग ऑन करुन त्यांच्या संस्थेची संबंधित माहिती अद्यावत करण्याबाबतही आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावेत. यासंदर्भात काही अडचण आल्यास संचालनालयाच्या आय.टी. सेलशी संपर्क साधण्यास सूचित करण्यात यावे.

"ब" सदर माहिती शैक्षणिक वर्ष २०१०-११ च्या माहिती पुस्तिका प्रकाशित करताना व प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांच्यादृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील काही संस्थांच्या संकेतस्थळाची, ईमेल आयडी व दूरध्वनी क्रमांक इत्यादीबाबतची माहिती अपूर्ण असल्याने आपल्या विभागातील संबंधित संस्थांना सदर माहिती संचालनालयाच्या वेबसाईटवरुन अद्यावत करण्याबाबत सूचित करण्यात यावे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल संस्थांकडून प्राप्त करुन तसे या कार्यालयास दि.२६/०२/२०१० पर्यंत सादर करण्यात यावा.

(सही)
( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

१२०३
जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१०/
दिनांक : 8 FEB 2010

प्रत :- प्राचार्य, शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम संस्था यांना माहितीस्तव देऊन सूचित करण्यात येते कि, उपरोक्त पत्रामधील "अ" प्रमाणे कार्यवाही करावी.

D:\Mayekar 08\Regional office.doc

(सही)
Joint Director (Admn.)
Technical Education R O
Aurangabad